**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 12 No.4** **Mar-Apr 2025**

# भोई समाजाचे राष्ट्रीय कार्यात योगदान

**डॉ. राजीव ए. बोरकर[1], श्वेता रामभाऊ बोरवार[2]**
[1]मार्गदर्शक, प्राध्यापक, संगीत विभाग,
गुलाम नबी आझाद कला व विज्ञान महाविद्यालय, बार्शीटाकळी
[2]संशोधक, एम.ए. संगीत, नेट
**Corresponding Author: डॉ. राजीव ए. बोरकर**
**Email:** borwarshweta71@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15172372**

**सारांश :**

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास हा शुरविरांच्या व विरांगणांच्या बलीदानाने भरलेला आहे. या लढ्यात अनेक वर्गाचे योगदान होते. स्वातंत्र्य संग्रामामध्ये मागासवर्गातील पुरुषांबरोबरच स्त्रियाही मागे नव्हत्या. त्यांच्या नजरेतून इंग्रजांच्या गुलामगीरीतून आपला भारत देश स्वतंत्र करणे हे एकमेव ध्येय होते. तसेच प्राचीन काळापासून भारतभूमीत मानवता जागवणारे ऋषी—महर्षी, महापुरुष व संतमहात्मे होवून गेले. मानवकल्याणासाठी ज्यांनी आपले जीवन वेचले, लोककल्याणासाठी आणि मानवाच्या उध्दारासाठी जे चंदनाप्रमाणे झिजले, संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे —**''बुडती हे जन, देखवेना डोळा येतो कळवळा म्हणोनीया ।''** अशी त्यांची वृत्ती होती.

**बीजशब्द :** शूरविर, दुर्गादल, उपनिषद, मत्स्यमहर्षी, भोई

**प्रस्तावना:**

भारतीय समाज सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात अनेक प्रकारच्या विसंगतीने व्यापलेला आहे. जाती—जमातीच्या अंतर्गत आणि बाह्य स्वरुपाचे व्यवहार करताना त्यांच्यामध्ये श्रेष्ठ—कनिष्ठ, उच्च—निच्च, स्पृश्य—अस्पृश्य असे भेदाभेद आढळतात. त्यामुळे प्रत्येक जाती—जमातीचे अस्तित्व स्वतंत्र आणि वेगळे असल्याचे दिसून येते. त्याचे प्रमुख कारण भारतीय विषम समाजव्यवस्था हेच आहे. वैदिक काळापासून विशेषत: चातुर्वण्र्य समाजव्यवस्थेतील 'कर्मविपाकाच्या सिध्दांतामुळे' जाती व जमातीची रचना अधिकच बंदिस्त होत गेल्याचे दिसते. ज्या पराभूत झालेल्या किंवा विस्थापित जमाती जेत्यांच्या हाती लागल्या, त्यांच्याबरोबर तत्कालीन प्रस्थापित समाजाने लादलेल्या धार्मिक व सामाजिक बहिष्कारापासूनही काहींच्या वाटयाला उपेक्षाच आली, तर काहींच्या वाट्याला कौतुकही आलं. त्यापैकीच एक भटकी जमात म्हणजे 'भोई' ही जमात होय.

**''खुब लडी मर्दानी थी, वह झॉसी की झलकारी थी ।''**

या ओळीने भारतीय स्वातंत्र्य युध्दातील एका भोई कन्येचे स्मरण या होते. १८५७ च्या उठावाच्या काळात इंग्रजांच्या गुलामी विरोधात क्रांतीच्या ज्योती पेटू लागल्या. इंग्रजांविरोधात भारतात विद्रोह होवू लागले, स्वातंत्र्यासाठी प्रयत्न होवू लागले, ज्यामध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाईचे नाव आदराने घेतले जाते. त्यांची शौर्यगाथा इतिहासात अमर आहे. त्यांच्याशी जोडलं गेलेलं इतिहासातील सुवर्णपान म्हणजेच विरांगणा 'झलकारीबाई'. झलकारी ही राणी लक्ष्मीबाईची एक विश्वासू परमसखी होती. झाशीच्या सैन्यातील स्त्री दुर्गादलाची ती मुख्य कमांडर होती. राणी लक्ष्मीबाईच्या रक्षणाचे उत्तरदायीत्व तिच्याकडे होते. तिने आपल्या त्यागाने व पराक्रमाने स्वत:ला इतिहासात अमर केले.

झलकारीबाईचा जन्म उत्तर प्रदेशातील झाशी जिल्ह्यातील भोजला या गावी एका भोई परिवारात झाला. तिचे वडिल मुलचंद हे झाशीच्या सैन्यात एक बहादूर सैनिक व प्रसिध्द तिरंदाज होते, ज्यामुळे झलकारी ही त्या वातावरणामुळे प्रभावित झाली होती. तीचा पती पुरन हा सुध्दा झाशीच्या सैन्यात काम करत होता. झलकारी वडिलांच्या मार्गदर्शनात तिरकामठा, भाला, तलवार चालवण्यात तरबेज झाली होती. राणीची आणि झलकारीची भेट झाल्यावर झलकारीने आपल्या पित्याच्या व पतीच्या साहसाच्या गोष्टी राणीला सांगीतल्या. त्याचबरोबर स्वत:च्या धडसी गोष्टीही सांगीतल्या, ज्यामुळे राणीवर त्याची विलक्षण छाप पडली. तिने झलकारीला आपल्या सेनेत रुजू करुन घेतले. तिथे झाशीच्या सुरक्षेसाठी स्त्रिसेना तयार करण्यात आली, त्या सेनेचे नाव 'दुर्गादल' असे होते. त्यामध्ये स्त्रियांना आखाड्याचा अभ्यास, मल्लखांब, आणि शस्त्रांचे प्रशिक्षण देण्यात आले. महिलांच्या

सबलीकरणामुळे झाशी आणि राणीच्या रक्षणार्थ त्यांनी विडा उचलला.

राणी लक्ष्मीबाईंनी दामोदरला दत्तक घेतले हे विधान नाकारुन इंग्रजांनी झाशीवर कुच केली. त्यावेळी दुर्गादलाने स्वत:च्या जीवाची पर्वा न करता लढाई केली. इंग्रजांविरुध्दच्या याच लढाईत झलकारीचा पती पुरन हा सुध्दा आपली तुकडी घेवून प्राण पणाला लावून लढत होता. परंतू राणीच्या विश्वासातल्या लोकांनी विश्वासघात केल्याने राणी इंग्रजांच्या हाती लागू शकली असती. परंतु त्यावेळी युक्ती चातुर्याने झलकारीने राणीचा वेष धारण करुन त्यांना स्वत:चा कापड देवून वेषांतर केले व राणी आणि दामोदरला झाशीच्या बाहेर काढण्यात यश मिळाले. इकडे झलकारीबाई इंग्रजांशी लढत होत्या. परंतु तेवढ्यात त्यांना त्यांचा पती पुरन याच्या मृत्युची बातमी आली. त्यावेळी त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. परंतू ही वेळ दु:ख करण्याची नसून कर्तव्यपालनाची होती. त्यामुळे झलकारी प्राणप्रतिष्ठेने लढली. जोपर्यंत झलकारी लढत होती, तोपर्यंत राणी झाशी सोडून सुरक्षित ठिकाणी पोहोचली होती. परंतू झलकारी ही इंग्रजांच्या हाती लागली. इंग्रजाच्या हाताने मृत्यू येण्यापेक्षा त्यांनी त्यांच्या दुर्गादलातील एका महिलेला त्यांच्या छातीत खंजीर खुपसण्यास सांगीतला आणि त्यात त्यांचा मृत्यु झाला. परंतू त्या इंग्रजांच्या शेवटपर्यंत हाती लागल्या नाही. झाशी राज्यातील शौर्याची एक तेजस्वी मशाल कायमची शांत झाली ती केवळ झाशीसाठी.

भारतात अनेक ऋषीमुनी व साधूसंत जन्मास आले. या संत महात्म्यांनी इश्वरभक्ती बरोबरच लोककल्याणासाठी व मानवतेच्या उद्धारासाठी आपले जीवन चंदनाप्रमाणे झिजवले. त्यातील एक भोई समाजातील व्यक्तिमत्व म्हणजे संतकवी भीमा भोई होय. त्यांचा जन्म ओरीसा राज्यात इ.स. १८६० मध्ये झाला. संत भिमा भोई यांच्या 'स्तूती चिंतामणी' व इतर चार ग्रंथात त्यांच्या जीवनकाळाबद्दल माहिती मिळते. भीमा हा लहानपणी गरीब आणि निराधार होता. त्यांना आई—वडिल लहान वयात सोडून गेल्याने त्यांचे जीवन खूप खडतर व एकाकी होते. लोकांची गुरे राखून तो आपला उदरनिर्वाह करित असे. याच काळात त्यांना तोंडी रचना करण्याचा छंद लागला. त्यांच्या काव्य संपदेमध्ये स्तूती चिंतामणी, कौतीसा मधुचक्र, आदि—अंत गीता, इ. चा समावेश होतो. ते ओरीसाचे महान संतकवी होवून गेले. त्यांच्या काव्यामध्ये—प्रवचनामध्ये अध्यात्माची मुलभूत तत्वे ठळकपणे मांडण्यात आली आहेत. त्यांच्या काव्यरचनेत ईश्वरप्राप्तीची साधने, अध्यात्मिक गुरुचे महत्व, कर्माचा सिध्दांत, बाह्य धार्मिक कार्याची निरर्थकता आणि मनूष्य जन्माच उद्देश, इ. विषयांवर विवेचन केलेले आहे. संत भीमाभोई यांनी आपल्याला जात, धर्म, लिंगभेद यांच्या वर उठण्याची प्रेरणा दिली आहे. यासोबतच अध्यात्मिक ज्ञान प्राप्त करण्यासाठी सद्गुरुपूर्ण जीवन अंगीकारण्याची प्रेरणाही त्यांनी त्यांच्या काव्यामध्ये दिली आहे. परंतू त्यांनी आपल्या आयूष्यात आपले साहित्य छापण्याचा प्रयत्न केला नाही किंवा ते जपूनही ठेवले नाही. त्यांच्या जीवनकाळात त्या प्रकाशितही झाल्या नाही. त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या अनुयायांनी त्यांची हस्तलिखिते प्रकाशित केली.

भिमाचे साहित्यातील मोठे यश म्हणजे त्यांनी उपनिषदातील अवघड कल्पना साध्या, गेय आणि अनलंकृत भाषेत आणि शैलीमध्ये प्रकट केल्या आहेत. आजही त्यांची गीते व भजने ओरीसातील जनतेने जपून ठेवली आहेत. ओरीसातील खेड्या—पाड्यांमध्ये संध्याकाळी टाळ आणि तंबोऱ्याच्या साथीत या भजनांचे स्वर आजही ऐकायला मिळतात. उडिया धार्मिक साहित्याच्या विकासामध्ये या भजनांचे स्थान अव्वल आहे. महाराष्ट्रात झालेल्या संत महात्म्यांचा जसा खूप छळ झाला, तसाच कर्मठ धर्मकांडांकडून अनन्विक छळ झालेला आहे. परंतू त्यातून त्यांचे जीवन बावनकाशी सोन्यासारखे उजळून निघाले.

प्राचीन काळापासून या भारतभूमीत मानवता जागवणारे ऋषी—महर्षी, महापुरुष व संत—महात्मे होवून गेले. मानवकल्याणासाठीच त्यांनी आपले जीवन वेचले. संत तुकारामांनी म्हटल्या प्रमाणे ''बुडती हे जन देखवेना डोळा । येतो कळवहा म्हणोनीया ।।'' ही त्यांची वृत्ती होती. अशा अनेक थोर संतांपैकीच भोई समाजात दादा धनीराम हे थो संत होवून गेले.

मध्यप्रदेशातील मंडला जिल्ह्यातील धुधरी या गावी १८७० चे आसपास दादा धनीराम हे मासेमारी करणाऱ्या ढिवर (भोई) कुटुंबात जन्माला आले. त्यांच्या शिक्षणासाठी त्यांच्या वडिलांनी खूप प्रयत्न केले. परंतू त्यांनी चवथीपर्यंत जेमतेम शिक्षण घेतले. मासेमारी करण्यात त्यांचे मन रमत नव्हते. ते सांसारिक बाबींपासूनही विरक्त होते. त्यातच आकबरी विभागात धनीरामला चपराशी म्हणून नोकरी लागली आणि त्यांचे आई—वडिलांनी जबरदस्तीने त्यांचे लग्न लावून दिले. त्यानंतर त्यांना दोन अपत्ये झाली. परंतु कामात, संसारात मन रमत नव्हते. एक दिवस त्यांनी विरक्त होऊन घर सोडण्याचा निर्णय घेतला व घनदाट जंगलामध्ये निघून गेले. ते कुणालाही दिसले नाही. १९२० ते १९२७ या सात वर्षांच्या काळात ते कुणालाही कुठेही दिसले नाही. परंतु सात वर्ष उलटून गेल्यानंतर मंडला या ठिकाणी ते नग्नावस्थेत आढळले. त्यांची तशी स्थिती पाहून कोणी त्यांना शिव्या देई, कुणी विक्षीप्त समजत, तर कुणी उपेक्षा करित असत. काही लहान मुले त्यांना त्रासही देत. परंतू सात वर्षांच्या अज्ञातवासात त्यांना ज्ञानाची प्राप्त

झाली. अनेक लोकांना त्यांच्या चमत्कारीक बोलण्याचा अनुभव आला आणि लोक त्यांच्यावर विश्वास ठेवू लागले. दादांचे डोळे अतिशय तिक्ष्ण होते. ते एखाद्याचा चेहरा बघून भूत—भविष्य सांगत असत, पुढे होणाऱ्या संकटाची जाणीव करुन देत असत. अनेक लोकांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले होते. त्यात सुप्रसिध्द गायिका सुलक्षणा पंडित या सुध्दा होत्या. तसेच मन्ना डे, मुकेश आणि जॉनी वॉकर हे दादांच्या दर्शनास नेहमी यायचे. मन्ना डे तर तीन दिवस आश्रमात राहिले आहेत.

दादांच्या हयातीतच 'दादा धनिराम सेवाश्रम समिती' गठीत झाली होती. त्यांच्या महानिर्वाणानंतर त्या समितीचे नाव 'दादा धनिराम सेवा आश्रम पब्लिक ट्रस्ट' असे झाले. दादा धनिरामांनी पेटविलेले धूनी आजही पेटत आहे. अनेक भक्तगण तिथे अजूनही जातात. तिथे आजही अद्भूत आनंद, निरवतेचे शांत वातावरण आहे.

लोककल्याणासाठी अविरत झटणारे भोई समाजाचे नेते म्हणून मत्स्यमहर्षी जतीरामजी बर्वे होत. त्यांनी स्वार्थ बाजूला ठेवून सेवाभावे आपले संपूर्ण आयुष्य देशाच्या कल्याणासाठी, उन्नतीसाठी समर्पित केले. 'मत्स्यमहर्षी' म्हणून विख्यात असलेल्या भोई समाजाच्या या लोकनेत्याचा जन्म दि. २१ एप्रिल १९२१ मध्ये रामटेक येथे झाला. हलाखीच्या परिस्थितीत सुध्दा त्यांनी आपल्या दिर्घ प्रयत्नांनी लोकसेवेचा जागर केला. ते गांधीजींचे कट्टर अनुयायी आणि समर्थक होते. जतीरामजी एक उत्तम संघटक व विधायक नेते होते, ते सदैव आपल्या मनमिळावू स्वभावाने लोकांना जोडण्याचे काम करित असत. ते भोई समाजातील असल्याने गरिब, अशिक्षित, असंघटीत मासेमारी करणारा समाज त्यांच्या नजरेसमोर होता. दिवसरात्र मासेमारी करुनही हा समाज गरिबीतच जगत आहे हेच त्यांनी पाहिले. त्यांचे जीवनमान उंचावत नव्हते. मासेमारी पूर्वपरंपरेने चालत होती. मासेमारीच्या प्रशिक्षणाची सोय करावी असेही त्यांना वाटत असे. भोयांच्या हितासाठी व त्यांचा आर्थिक पाया मजबूत करण्यासाठी त्यांनी स्थानिक पातळीवर मत्स्यपालन सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन दिले. जिल्हा पातळीवर जिल्हा मत्स्यसंघ, तर विदर्भ विभागीय मच्छिमार संघटना सहकारी संघाची त्यांनी स्थापना केली. महाराष्ट्र मत्स्यउद्योग विकास मंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. मासेमारी क्षेत्रात भोई समाजाला स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी त्यांनी अपार कष्ट केले. अखिल महाराष्ट्र भोई समाज सेवा संघ, पूणे तसेच राष्ट्रीय पातळीवर मत्स्य सहकारी महासंघ स्थापन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांचे स्वत:चे शिक्षण जरी कमी असले तरी शिक्षणासाठी ते झटत होते. मुला—मुलींचे शिक्षण झाले तर समाज सुशिक्षित होईल असे त्यांना वाटत असे. ते जेंव्हा रामटेकचे नगराध्यक्ष होते तेंव्हा त्यांनी स्वत:च्या कारकिर्दीत स्वत:चे घर प्राथमिक शाळेकरिता दान दिले. या दानाला दुसरी तोड नाही. याचा शाळेला त्यांच्या निधनानंतर 'जतिरामची बर्वे प्राथमिक शाळा नगर पालिका, रामटेक' असे नाव देण्यात आले. जतिरामजी बर्वे यांना मत्स्य क्षेत्रातील अपूर्व कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना मरणोत्तर 'मत्स्यमहर्षी' ही पदवी देवून यथोचित गौरव केला.

**निष्कर्ष:**

भारत देश हा संतांचा देश आहे. भारताला संस्कृतीचा समृध्द वारसा लाभलेला आहे. अनेक धर्म, जाती, पंथांचे लोक इथे वास्तव्य करतात. स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेक शूरविरांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. काही शूरविरांच्या कार्याचा उल्लेख हा सर्वज्ञात आहे. मात्र काही असे शूरविर आहे, समाजसुधारक आहे की ज्यांचे कार्य हे अभ्यासल्या गेले नव्हते. त्यातील विशिष्ट समाज म्हणजे भोई समाज. या समाजातील स्वातंत्र्य लढ्यातील काही निवडक शूरविरांचे कार्य या शोधनिबंधामध्ये थोडक्यात उलगडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. नैमिशराय मोहनदास, 'पुर्वोक्त विरांगणा झलकारीबाई', राधाकृष्ण प्रकाशन.
2. भारद्वाज, डॉ. के. एस., 'विरांगणा झलकारीबाई', नम्या प्रकाशन.
3. नागपूरे कृष्णाजी, 'भोई समाजातील महान व्यक्तिचित्रे, सांगीतिका व गीते', पायल ऑफसेट, भानापेठ, चंद्रपूर.
4. दुधपचारे, प्रा. योगेश, 'भोई समाज — इतिहास आणि आरक्षणाच्या दिशा'.